**प्रेस नोट दिनांक १३/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**हरविलेल्या वयोवृध्द महिलेचा तात्काळ शोध घेऊन, महिलेस नातेवाईकांच्या ताब्यात सुखरुप दिले**

-----------||-----------

दि. ०८.०७.२०१९ रोजी १८.३० वा. चे सुमारास इसम नामे महेंन्द्र सुभाष शिंदे, वय ३२ वर्ष रा. लोहियानगर पुणे यांनी लोहियानगर पोलीस चौकीस समक्ष येऊन कळविले की, त्यांची आजी शेषाबाई सुखदेव माने, वय ८० वर्ष रा. रा. मुपो आष्टी, जि. सोलापुर हया त्यांची मुलगी नामे - सुधामती शिंदे रा. ५४ एच. पी. लोहीयानगर, पुणे यांना भेटण्यासाठी लोहीयानगर या ठिकाणी आल्या असता, रस्ता चुकल्याने त्या हरविल्या आहेत.

लोहीयानगर पोलीस चौकीचे पोलीस उप निरिक्षक, श्री. मिसाळ यांनी लोहीयानगर बीट मार्शल कर्मचारी पोलीस शिपाई धोत्रे व पांडे यांना सदर वयोवृध्द महिलेचा तात्काळ शोध घेणेसाठी हद्दीत रवाना केले. नमुद कर्मचारी हे वयोवृध्द महिलेचा शोध घेत असताना टिंबर मार्केट, भवानी पेठ, पुणे या ठिकाणी सदर वयस्कर महिला मिळुन आल्या. सदर महिलेस ताब्यात घेऊन लोहीयानगर पोलीस चौकी या ठिकाणी आणण्यात आले. सदर महिलेचे नातु महेंन्द्र सुभाष शिंदे, वय ३२ वर्ष रा. लोहियानगर पुणे यांना पोलीस चौकीस बोलावुन घेऊन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत सदर महिला हया त्यांची आजी - शेषाबाई सुखदेव माने, वय ८० वर्ष रा. रा. मुपो आष्टी, जि. सोलापुर असल्याचे ओळखले. सदर वयोवृध्द महिलेस त्यांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

